पत्नी सौ. कुंदा हिच्याशी चर्चा केली, त्यावेळी तिनेही माझी भूमिका योग्य असे सांगितले. मात्र श्री. वसंतराव भागवतांनी माझा पिच्छा सोडला नाही. ते आम्हा दोघांच्याशी चर्चा करण्यासाठी घरी आले. चर्चेअंती तुम्ही नोकरी सोडणार असाल, तर मी नोकरी करुन संसाराचा भार उचलेन. तथापि त्यासाठी मला बी. एड्. व्हावे लागेल, राजकारणात केव्हा काय होईल, कसे मतभेद होतील याचा भरवसा नसतो. त्यामुळे मी शिक्षिकेची नोकरी करीन असे सौ. कुंदाने सांगितले आणि आमचा निर्णय झाला. त्यासाठी लागलीच सौ. कुंदाने बी. एड्. साठी महाविद्यालयात प्रवेशही घेतला. खिरा कंपनीचे मालक श्री. जयानंद खिरा आणि श्री. हिंमतभाई खिरा यांनी नोकरीतून मुक्त करताना शुभेच्छा देत पुन्हा ज्यावेळी नोकरी करण्याची आवश्यकता निर्माण होईल त्यावेळी आमच्या कंपनीची द्वारे तुमच्यासाठी खुली आहेत असे सांगून आश्वस्त केले. नोकरीतही मन लावून काम केल्यामुळेच हे आपणहून आश्वासन दिले गेले.

1969 पासून भारतीय जनसंघाचा मुंबईचा संघटन मंत्री म्हणून मी काम करण्यास सुरुवात केली. सर्व पदाधिका-यांचे उत्तम सहकार्य आणि मार्गदर्शन यामुळे भारतीय जनसंघाचे काम मुंबईत वाढविण्यासाठी माझा उपयोग होऊ लागला. वेगवेगळ्या आंदोलनांचे विषय हाताळत असतना संघटना मजबूत करण्यासाठी मी अक्षरशः रात्रंदिवस मेहनत करीत असे. त्यासाठी जनसंघाने मुंबईतील पहिले वाहन स्कूटर माझ्यासाठी खरेदी केले. त्या स्कुटरवरुन कुलाबा ते दहिसर आणि दुसरीकडे मुलूंड, चेंबूर असा प्रवास होऊ लागला. अक्षरशः उभी मुंबई मी त्या पाच वर्षात पिंजून काढली.

भारतीय जनसंघाच्या संघटनात्मक कामाला गती येत होती. मात्र त्याचवेळी देशामध्ये महागाई, भ्रष्टाचार यांचे थैमान सुरु झाले होते. तशात 1971 मध्ये पाकिस्तानशी झालेल्या युद्धात भारताला विजय मिळाल्यामुळे बांगला देश निर्माण झाला. त्या राजकीय परिस्थितीचा लाभ घेत पंतप्रधान कै. इंदिरा गांधी यांनी लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका जाहीर करुन प्रचंड विजय मिळविला. महागाई आणि भ्रष्टाचार यांच्याविरुद्ध सर्वच विरोधी पक्षांनी आंदोलने सुरु केली होती. कै. जयप्रकाश नारायण यांनी त्या आंदोलनाचे नेतृत्व स्विकारले. त्यामुळे असंतोषाची धार अधिक तीव्र झाली. सरकारने दडपशाहीच्या मार्गाने आंदोलने दडपण्याचा प्रयत्न केला. 1975 मध्ये देशावर आणीबाणी लादली गेली.

दुसरीकडे संघटन मंत्री म्हणून पक्षाला पाच वर्षे दिली होती तो काळ 1974 मध्ये संपला. पुन्हा नोकरी करण्यासंबंधी विचार सुरु झाला तेव्हा मुंबई भारतीय जनसंघाचे अध्यक्ष श्री. झमटमल वाधवानी यांनी मी पुन्हा खिरा कंपनीमध्ये जाण्याऐवजी त्यांच्या उद्योग समुहातच नोकरी करावी जेणेकरुन नोकरी व पक्षकार्य यांची सांगड घालणे सोपे होऊन पक्षाच्या कामाची गती कमी होणार नाही असे सुचविले. तो मार्ग व्यवहार्य वाटल्यामुळे त्यांची कंपनी ॲबमेफ कन्सलटंट्स मध्ये महाव्यवस्थापक म्हणून मी नोकरीस सुरुवात केली. तथापि, आणीबाणी पुकारल्यानंतर श्री. झमटमल वाधवानी यांना अटक करण्यात आली. त्यांचे इन्कमटॅक्सचे काम करणारे श्री. मनोहरपंत मुझुमदार हे मुंबई रा. स्व. संघाचे कार्यवाह असल्यामुळे त्यांनाही अटक झाली. तर विक्रीकराचे काम पाहाणारे श्री. किसन घारपुरे यांनाही ठाणे येथे अटक करण्यात आली. मला मात्र अटक करण्यात आली नाही. त्यामुळे नोकरीच्या ठिकाणची जबाबदारी खूप वाढली. तसेच मुंबईत आणीबाणीच्या विरोधातील असंतोष संघटित करण्याचे पक्षाचे कामही माझ्याकडे आले. जनसंघातर्फे मी, समाजवादी पक्षातर्फे श्री. प्रभुभाई संघवी, संघटना कॉंग्रेसतर्फे श्री. प्राणलाल व्होरा, तर सर्वोदय मंडळातर्फे श्री. गोविंदराव देशपांडे असे संयुक्तपणे विचार करुन मुंबईत आणीबाणीच्या विरोधात जनमत संघटित करत असू. त्याचप्रमाणे कारागृहात अटकेत असलेल्या संघ-जनसंघाच्या कार्यकर्त्यांच्या कुटुंबियांशी समन्वय ठेवण्याची जबाबदारीही माझ्याकडे होती.

आणीबाणी संपली. त्यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत मुंबईच्या सहाही जागा जनता पक्षाने जिंकल्या. त्यानंतर भारतीय जनसंघ, समाजवादी पक्ष, संघटना कॉंग्रेस आणि जनता दल या पक्षांचे औपचारिक विलिनीकरण करुन जनता पक्ष या नावाने नवीन पक्ष सुरु करण्याचे ठरले. आता यापुढे भारतीय जनसंघाचे अस्तित्व राहणार नाही म्हणून मुंबई जनसंघाच्या कार्यकारिणीची शेवटची दोन दिवसांची बैठक लोणावळा येथे आयोजित केली होती. माझ्या वाढदिवसाला 16 एप्रिलला मी घरी नाही म्हणून मुली नाराज होत्या. दुस-या दिवशी बैठकीहून परत येत असताना पनवेलच्या पुढे आमच्या जीपला जबरदस्त अपघात झाला. माझ्या शेजारी असलेले पश्चिम उपनगर जिल्ह्याचे अध्यक्ष ॲड. चंद्रबली सिंह यांचा जागीच मृत्यू झाला. मलाही जबरदस्त मार लागल्यामुळे जवळ-जवळ तीन महिने शीवच्या लोकमान्य टिळक महापालिका रुग्णालयात मानेला ट्रॅक्शन लावून राहावे लागले. काय योगायोग असतात. 17 एप्रिल 1977 म्हणजेच माझ्या वाढदिवसाच्या नंतरच्या दिवशी एका अर्थाने मी स्वर्गाच्या दारापर्यंत पोहोचून परत आलो होतो. मला जीवनदान मिळाले. लोकमान्य टिळक रुग्णालयात ट्रॅक्शन लावून तीन महिने झोपून काढणे किती कंटाळवाणे. पण जनता पार्टीचे राज्य आले होते.



श्री. लालकृष्ण आडवाणींच्या हस्ते श्री. सुधीर फडके यांच्या सत्कारसमयी व्यासपीठावर श्री. नाईक यांच्यासोबत शिवशाहीर श्री. बाबासाहेब पुरंदरे